# ‘ससून’ला दोन कोटींची मदत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

## मुकुल माधव फाउंडेशन, फिनोलेक्सचे साह्य

ससून रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) आणि एंडोस्कोपी युनिटच्या अद्ययावत उपकरणांसाठी दोन कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. फिनोलेक्स कंपनी आणि मुकुल माधव फाउंडेशन यांनी हे अर्थसाह्य केले आहे. अद्ययावत उपकरणांमुळे गरिबांना चांगल्या दर्जाचे उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

ससून रुग्णालयातील एनआयसीयू, तसेच एंडोस्कोपी विभागात ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे. एंडोस्कोपी विभागात किरणांपासून बचावासाठी अल्ट्रा साउंड विथ हेड प्रोटेक्शन, थायरॉइड शिल्ड, लीड ॲप्रॉन, प्रोटेक्टिव्ह आय गिअर्स, ओजिडी स्कोप आदी उपकरणांचा समावेश आहे. तसेच ‘एनआयसीयू’मध्ये अत्याधुनिक सेंट्रल एअर प्रेशर, दोन, सिपाप, ब्लड गॅस ॲनालायझर, ब्रेन ॲनालायझर या उपकरणांचा समावेश आहे. दोन वर्षांपूर्वी ५१ बेडचे एनआयसीयू युनिट, तर गेल्या वर्षी मार्चमध्ये एंडोस्कोपी युनिट सुरू करण्यात आलेले आहे. येत्या १६ एप्रिलला नवजात शिशू अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) दुसऱ्या, तर एंडोस्कोपी युनिटच्या पहिल्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने या अद्ययावत यंत्रणेचे औपचारिक उद्घाटन होणार आहे.

मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, ‘ससून रुग्णालयाच्या एनआयसीयू आणि एंडोस्कोपी या विभागात अद्ययावत उपचार सहज मिळावेत यासाठी आवश्यक उपकरणांसाठी आम्ही दोन कोटी रुपयांची मदत केली आहे. त्यामध्ये विविध यंत्रणांचा समावेश आहे. समाजाला आरोग्य सुविधा अल्पदरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी आमचा प्रयत्न आहे. ‘एनआयसीयू’मुळे गेल्या दोन वर्षांत ५२०० बाळांना जीवदान मिळाले, तर एंडोस्कोपीमार्फत ३५० ते ११५० रुपयांत उपचार देण्यात यश आले याचा आनंद आहे. ससून रुग्णालयाच्या परिसरात विविध विकासकामे आम्ही मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स कंपनीच्या माध्यमातून केली आहेत.’

बी. जे. मेडिकल कॉलेजचे माजी अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले म्हणाले, ‘ससून रुग्णालय आणि उद्योगसमूह यांच्या संयुक्त प्रयत्नांतून चांगला उपक्रम सुरू झाला आहे. ससूनला आज समाजाकडून अर्थसाह्य मिळत आहे. त्यामुळे उपचार अत्याधुनिक होत आहेत. सर्वसामान्यांना परवडतील अशा अनेक शस्त्रक्रिया येथे होत आहेत. ‘ससून फॉर कॉमन मॅन’ ही संकल्पना प्रत्यक्षात येत आहे. त्यामुळे ससून रुग्णालय अधिकाधिक लोकाभिमुख आणि लोकप्रिय होत आहे.’